## आनंदनगर सबवेच्या गर्डर लाँचचे काम झाले पूर्ण

**दिनांक ३० ऑक्टोबर, २०२२:** पूर्व द्रुतगती महामार्गावरील कोपरी येथील रेल ओव्हर पुलाच्या आनंदनगर सबवेच्या गर्डर लाँचचे काम आज पूर्ण झाले, ज्या साठी प्राधिकरण आणि कंत्राटदार यांच्याकडून एकूण 50 कर्मचारी कार्यरत होते. सदर काम दि.29.10.2022 रात्री 11 वाजल्यापासून दि.30.10.2022च्या सकाळी 6 वाजेपर्यंत सुरू होते. 200 टन क्षमतेच्या 2 क्रेन प्रत्यक्ष गर्डर च्या उभारणी साठी वापरण्यात आली होती. समान क्षमतेची एक अतिरिक्त क्रेन स्पेर म्हणून ठेवण्यात आली होती. तसेच 100 टन क्षमतेच्या 2 क्रेन गर्डर ठेवण्यासाठी वापरण्यात आली होती. 2+2पथ मर्गिकेच्या पुलाचे 4+4 असे अपग्रेड केल्या मुळे द्रुतगती महामार्गावरील लहान तसेच अवजड वाहनांना फायदा होईल ज्यामुळे वाहतूक कोंडी कमी होईल. गर्डरच्या उभारणी नंतर प्रकल्पाचे 85 टक्के काम पूर्ण झालं आहे.

सदर कामाचा संपूर्ण खर्च एमएमआरडीए करणार असून या साठी 258कोटींचा निधी वापरण्यात येणार आहे. तसेच आत्तापर्यंत प्राधिकरणामार्फत 210 कोटींचा निधी खर्च करण्यात आला आहे. सदर गर्डर च्या उभारणी नंतर पुलाच्या दोन्ही बाजूच्या पोहोचमर्गांच्या काँक्रेटायझेशन चे आणि रेल्वेच्या गर्डर चे काम शिल्लक राहील.

सदर प्रकल्प प्रगत टप्प्यात असल्याने येत्या 3 महिन्यांत प्रकल्प पूर्ण करण्याचा मानस आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी कोणतीही नवी डेड लाईन नाही.

